


# २४ वा वर्धापन दिन

। रविवार दि.१९ ऑक्टोबर २०२५

सुराज्य सोलापूर

# IMS GROUP OF SCHOOLS

**Navi Mumbai | Pune | Solapur | Akkalkot**

Nurturing Empathetic, Accountable, Thriving Young Champions

| Founder - President | Chairman | Secretary |
|---|---|---|
| Shree Shikshan Pratishthan | IMS Group of Schools | IMS Group of Schools |
|  |  |  |
| Prof. A. D. Joshi | Mr. Amol Joshi | Mrs. Sayali Joshi |

24 Years in Education

15 Institutes
14000+ Students

OUR INSTITUTES

## INDIAN MODEL INTERNATIONAL SCHOOL (CBSE) PUNE

9209571130 / 8087671288



## INDIAN MODEL SCHOOL & JUNIOR COLLEGE (CBSE) ULWE, NAVI MUMBAI

9321077233



## INDIAN MODEL INTERNATIONAL SCHOOL (CBSE)

7822090791



## INDIAN MODEL SCHOOL, STATE BOARD

0217 - 3553164 / 3550788



## INDIAN MODEL SCHOOL, CBSE

0217 - 3553164 / 3550788



## MODEL PUBLIC SCHOOL

0217 - 2990180



## INDIAN MODEL SCHOOL, AKKALKOT

8624020479



## A. D. JOSHI JUNIOR COLLEGE

3552444



## SWAMI VIVEKANAND POLICE PUBLIC SCHOOL

0217 - 2312285




## VED PATHASHALA, MULSHI, PUNE

8087671288 / 9209571130



IMS GROUP OF SCHOOLS
NAVI MUMBAI | PUNE | SOLAPUR

**WE INVITE ADMISSIONS FOR THE SESSION**

**2026-27**
**Nursery to Grade IX**

Admission forms are available at school website

**www.imsschools.in**

Scan for Website
www.imsschools.in

सुराज्य सोलापूर च्या वर्धापनदिनास व दीपावलीच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा

# 0217 - 3553164 / 3550788

**Contact for Further Details**

# व्यावसायिक दृष्टीकोनातून सोलापूर

तसं पाहिलं तर आपलं सोलापूर हे विविध ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक वैशिष्ट्यांसह बहुभाषिकता ही एक वेगळीच ओळख असणारं पश्चिम महाराष्टातील एक महत्वाचं शहर आहे. या शहाराने विशेषतः अलीकडच्या काळात विविध क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. शहराच्या आर्थिक प्रगतीच्या दृष्टीने विशेषतः औद्योगिक व सेवा क्षेत्रात होणारी वाढ रोजगार वृद्धीच्या दृष्टीने महत्वाची ठरत आहे. सध्या सोलापूर शहर व ग्रामीण विकासाचे चक्र गतिमान करण्यात शहरातील पारंपारिक कापड उद्योग, लोकमंगल उद्योग समुह, प्रिसिजन उद्योग, बालाजी अमाईन्स उद्योग, लक्ष्मी उद्योग समूह, किर्लोस्कर फेरस इंडस्ट्रीज लि., चिंचोळी व अक्कलकोट रोड औद्योगिक वसाहती, होटगी रोड परीसातील लघु उद्योग आणि फताटेवाडी येथील राष्ट्रीय औष्णिक उर्जा प्रकल्प हे महत्वाची भूमिका बजावताना दिसतात. पण सोलापूर शहराचा भविष्यात होणारा विकास आणि आपले शहर कोणत्या क्षेत्रात पुढे जाऊ शकते या बाबींवर प्रकाश टाकणे महत्वाचे आहे.




**प्रा. डॉ. राजाराम पाटील**

**वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर**


> एक वेळ भोंग्यावर चालणारे शहर अशी ओळख असणारे सोलापूर आज विकासाच्या टप्प्यावर असल्याचे दिसून येते. सोलापुरातील कापड उद्योग ही आपली पारंपारिक ओळख होती, आजही हा व्यवसाय जोमानं सुरु असल्याचे दिसून येते. पण त्याबरोबरच सध्या शहरात तयार कपड्यातील मोठमोठ्या नामांकित कंपन्यांनी आपल्या अलिशान शोरूम्स सुरु केल्या आहेत. पादत्राणे व्यवसायाने नामांकित ब्रॅन्ड्स आपल्यासाठी उपलब्ध केलेले आहेत. सोलापूरची खाद्य संस्कृती आणि या क्षेत्रातील हॉटेल व्यवसायाने सोलापूरची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज जगातील नामांकित कंपन्या तयार अन्न लोकांच्या घरापर्यंत पोहचवणारी सेवा सोलापूरकरांना देताना दिसून येतात.




पुढील सोलापूर कसे असेल याचा विचार करताना लोकसंख्या हा घटक महत्वाचा ठरतो. सन १९५१ मध्ये २ लाख ७८ हजार ९२२ इतकी असणारी शहराची लोकसंख्या सन २०११ मध्ये ९ लाख ५१ हजार ५५८ आणि २०२५ मध्ये अंदाजे ती १३ लाख ९१ हजार इतकी वाढली असून वाढीचा दर जवळपास एक टक्यांपेक्षा अधिक असल्याचे दिसते. सोलापूरच्या एकूण लोकसंख्या वाढीचा विचार करता गेल्या चौदा वर्षात शहराची लोकसंख्या जवळपास ४ लाख ३९ हजार ४४२ इतकी वाढली असून शहर चारही बाजूला रुंदावत असल्याचे दिसून येते. या वाढीबरोबरच लोकांच्या आवडी निवडीत होणाऱ्या बदलांननुसार त्यांच्या मागणीतही बदल होताना दिसून येतो. त्यामुळे लोकसंख्या वाढीबरोबरच सोलापूरचा केवळ भौगोलिक विस्तार होतोच असे नाही तर, याबरोबरच शहरात अनेकविध लहान मोठे उद्योग, व्यवसाय आणि सेवा देणाऱ्या विविध व्यापारी संस्थात वाढ होताना दिसत आहे.

अर्थात, व्यावसायिकदृष्ट्या पुढील सोलापूर कसे असेल याचा विचार करता, गेल्या पंचवीस वर्षापूर्वीच सोलापूर शहर आणि आजचे सोलापूर यात कमालीचा बदल झाल्याचे जाणवते. एक वेळ भोंग्यावर चालणारे शहर अशी ओळख असणारे सोलापूर आज विकासाच्या टप्प्यावर असल्याचे दिसून येते. सोलापुरातील कापड उद्योग ही आपली पारंपारिक ओळख होती, आजही हा व्यवसाय जोमानं सुरु असल्याचे दिसून येते. पण त्याबरोबरच सध्या शहरात तयार कपड्यातील मोठमोठ्या नामांकित कंपन्यांनी आपल्या अलिशान शोरूम्स सुरु केल्या आहेत. पादत्राणे व्यवसायाने नामांकित ब्रॅन्ड्स आपल्यासाठी उपलब्ध केलेले आहेत. सोलापूरची खाद्य संस्कृती आणि या क्षेत्रातील हॉटेल व्यवसायाने सोलापूरची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज जगातील नामांकित कंपन्या तयार अन्न लोकांच्या घरापर्यंत पोहचवणारी सेवा सोलापूरकरांना देताना दिसून येतात. सुवर्ण अलंकार हा सर्वांसाठीच हवाहवासा असणारा दागिना असून हा व्यवसाय सोलापूरकरांच्या घरापर्यंत येऊन पोहचला आहे. सोलापुरातील पारंपारिक सराफ कट्ट्याबरोबरच या क्षेत्रातील आघाडीच्या शोरूम्स आपल्या शहरात सुरु झाल्या असून गेल्या दसऱ्याच्या मुहूर्तावर सोलापूर शहरात जवळपास तीस किलो सोन्याची विक्रमी विक्री झाल्याचा अंदाज आहे. पुणे मुंबईच्या धरतीवर मॉल अथवा मार्ट नावाची बाजार चेन आपल्याकडे जोमाने सुरु झाली असून सोलापूरसह ग्रामीण ग्राहकांना आपल्याकडे आकर्षित करत आहे. सोलापूरच्या अर्थकारणाला गतिशील करण्यासाठी भारतीय रेल्वे अखंड सेवा देत आहे. विमानतळाचा म्हणजेच हवाईवाहतुकीचा प्रश्नही मार्गी लागला असून येणाऱ्या काळात सोलापूरच्या औद्योगिक आणि पर्यटन क्षेत्राच्या विकासात भरच पडणार आहे. हे सर्व घटक आज सोलापूरच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरणारे आहेत. केवळ बाजार विस्तार म्हणून या घटकांकडे न पाहता सोलापूरकरांच्या रोजीरोटीच्या दृष्टीनेही ते महत्वाचे ठरत आहेत. या सर्व व्यवसायातून हजरो तरुणांच्या हाताला काम मिळाले असून सोलापूरच्या रोजगारवृद्धीत वाढ झाली आहे. शहरातील एका नामांकित मॉलमध्ये जवळपास ७०० कर्मचारी कार्यरत आहेत. त्यामुळे भविष्यात रोजगार वृद्धीद्वारे उत्पन्न-खर्चाच्या चक्रास गती मिळून सोलापूरच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाल्यास नागरिकांच्या राहणीमानाच्या दर्जातही सुधारणा होण्यास मदत होईल.

विशेष बाब म्हणजे देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात वाहन उद्योगाचे ७.१ टक्के इतके योगदान असून जवळपास ३७ दशलक्ष लोकांना रोजगार देणारे हे क्षेत्र आहे. वाहनांच्या सुट्या भागांची निर्मिती क्षेत्राचे योगदान २.५ टक्के आहे. महाराष्ट्राच्या सकल राज्यांतर्गत उत्पादनात वाहन उद्योगाचा वाटा जवळपास ७ टक्के असून औद्योगिक सकल राज्यांतर्गत उत्पादनात या क्षेत्राचे योगदान १५.३ टक्के इतके आहे. केंद्र सरकारच्या जी. एस. टी. २.० अंतर्गत केलेल्या कर कपातीचा प्रभाव म्हणून २२ सप्टेंबर, २०२५ पासून दसऱ्याच्या मुहर्तापर्यंत ११.५७ लाख वाहनांची विक्रमी विक्री झाली आहे. सोलापूर शहर व ग्रामीण भागात दसऱ्याच्या मुहूर्तावर जवळपास २००० दुचाकी आणि ७०० चारचाकी वाहने विकली गेली, हा आत्तापर्यंतच्या विक्रीचा उच्चांक मानला जातो. सोलापूर आणि जिल्ह्यात दुचाकीसह सर्वच प्रकारच्या गाड्यांच्या विक्रीसाठी मोठमोठी शोरूम्स सेवा देत असून विशेषतः सोलापूरच्या जुळे सोलापूर भागात दुचाकी वाहन विक्रीच्या मोठ्या शोरूम्स सुरु झाल्या आहेत. सोलापूरच्या पुढील विकासाच्या दृष्टीने हे क्षेत्र महत्वाचे मानले जात आहे. कारण भविष्यात वाहन उद्योग आपली उत्पादन चेन जर सोलापुरात निर्माण करत असतील तर ते सोलापूरच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. कारण हे उद्योग अनेक प्रकारच्या सेवा देताना त्यात हजारो सोलापूरकरांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत आहेत. या खेत्रात वाहन विक्रीच्या शोरूम्स, कारची अंतर्गत साजावत, कार वॉश सेंटर्स, टायर स्टोअर्स, वाहनांविषयी माहिती देणाऱ्या वेबसाईट,

(पान ४ वर...)















## सुराज्य सोलापूर २४ व्या वर्षात पदार्पण...

अस्सल सोलापुरी हे ब्रीद अंगिकारून दैनिक सुराज्य उभारणी २३ वर्षांपूर्वी सोलापूरच्या भूमीत झाली.सोलापूरकरांच्या प्रेरणेने आणि पाठबळाने हे दैनिक यंदा २४व्या वर्षात पदार्पण करीत आहे.
हे सांगताना आम्हाला आनंद होत आहे.शनिवारी सुराज्य परिवार हा वर्धापन दिन साजरा करत आहे. यानिमित्ताने आम्ही एक वैचारिक शिदोरी सोलापूरकरांच्या पदरात ठेवत आहोत. सोलापूर आता कात टाकतंय...नियतीनं आपल्याला भरभरून दान दिलंय.विमानसेवा सुरू झाली. उड्डाण पूल तयार होतायेत. चारही दिशांनी महामार्गाचं जाळं पसरलंय. ड्रेन थांबणार असून बुलेट ट्रेनचं काम प्रगतीपथावर आहे. आयटी पार्कचा शब्द सरकारने सोलापूरकरांना दिलंय.सोलापुरात काय नाही.सर्वकाही आहे.यंदाच्या वर्धापन दिनाची थीम आहे,नवं सोलापूर.सोलापुरात काय काय समृद्धी आहे हे आम्ही नवं सोलापूरच्या व्यासपीठावरून एक वैचारिक अंक आम्ही आजपासून सोलापूरकरांच्या हाती ठेवत आहोत.या अंकासाठी सोलापुरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी सकस विचार मांडला आहे.आमच्या आवाहनाला प्रतिसाद देवून लेखकांनी नव सोलापूर या व्यासपीठाला सोनेरी झालर लावल्याबद्दल आम्ही सर्वप्रथम त्यांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानतो.या नव सोलापूरच्या वैचारिकतेतून सर्वांनी मिळून आपण नवं सोलापूर घडवण्यासाठी ही सिद्ध होवू यात, हीच श्रीसिद्धेश्वर चरणी प्रार्थना...

# सोलापूरची विमान सेवा व आयटी इंडस्ट्री
# विकासाचे नवे क्षितिज

''विकास'' हा सध्याचा सर्वात लोकप्रिय व प्राधान्यक्रम असलेला एक परीवलीचा शब्द तथा संकल्पना चर्चेत आहे. नुकतंच अगदी अचाट शक्ती- सामर्थ्य नेतृत्वाला देखील लुभावणार पारितोषिक म्हणजेच ''नोबेल पारितोषिक''.त्याामधील अर्थशास्त्राचे नोबेल हे एका संकल्पनेला देण्यात आलं, ''कन्स्ट्रक्टिव्ह डिस्ट्रक्शन''. याचाच अर्थ नवतंत्रज्ञान आत्मसात करताना त्याची आव्हानं देखील स्वीकारून एक नवी विकासाभिमुख अर्थव्यवस्था निर्माण होणे किंबहुना करणे, ही संकल्पना. विकास आणि एकूणच विकासावर चर्चा व क्रियान्वयन होत असताना एक औचित्य ''विमानसेवेच्या विस्ताराचं''. विमान सेवा व आयटी इंडस्ट्री याचा समन्वय तथा एकमेकांना पूरक होऊन सोलापूरचा अधिकचा व गतिमान विकास अस्तित्वात येणार आहे, असे आपण आग्रहाने म्हणू शकतो. सोलापूर हे महाराष्ट्रातील एक प्राचीन, ऐतिहासिक व सांस्कृतिक वैभव लाभलेले शहर आहे. कापड उद्योग, शिक्षणसंस्था, धार्मिक स्थळे, दगडशिल्प, तसेच सामाजिक-सांस्कृतिक परंपरा यामुळे या शहराची ओळख जागतिक स्तरावर झाली आहे. परंतु एकविसाव्या शतकातील विकासाच्या शर्यतीत एखाद्या शहराची खरी ताकद ही त्याच्या संपर्क व्यवस्थेत आणि ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्थेत दडलेली असते. आधुनिक काळात सोलापूर नव्या युगाच्या स्वागतासाठी सज्ज होत आहे. विमानसेवा आणि माहिती-तंत्रज्ञान (आयटी) उद्योग ही दोन अत्यंत महत्वाची क्षेत्रे आहेत, जी सोलापूरच्या विकासाला नवे आयाम देऊ शकतात. विमानसेवा उपलब्ध झाल्यामुळे शहर जगभराशी थेट जोडले जाईल. तर आयटी इंडस्ट्रीमुळे ज्ञानाधिष्ठित अर्थव्यवस्था उभी राहील, रोजगारनिर्मिती होईल आणि सामाजिक बदल घडतील. या दोन्ही घटकांमुळे सोलापूर हे महाराष्ट्रातील केवळ पारंपरिक उद्योगांचे केंद्र न राहता भविष्याचे गतिमान महानगर म्हणून विकसित होईल.

> आधुनिक काळात सोलापूर नव्या युगाच्या स्वागतासाठी सज्ज होत आहे. विमानसेवा आणि माहिती-तंत्रज्ञान (आयटी) उद्योग ही दोन अत्यंत महत्वाची क्षेत्रे आहेत, जी सोलापूरच्या विकासाला नवे आयाम देऊ शकतात. विमानसेवा उपलब्ध झाल्यामुळे शहर जगभराशी थेट जोडले जाईल.

**विमान सेवेचे महत्व :**

विमान सेवा ही केवळ प्रवासाची सुविधा नसून ती व्यापार, पर्यटन, शिक्षण, वैद्यकीय सेवा आणि सांस्कृतिक आदानप्रदान यांना गती देणारे सर्वात मोठे साधन आहे. तर आयटी उद्योग हा आधुनिक युगाचा कणा आहे. जगातील अर्थव्यवस्था आज डिजिटायझेशन, सॉफ्टवेअर, डेटा विश्लेषण, आर्टिफिशियल इंटेलिजन्स अशा क्षेत्रांवर आधारलेली आहे. सोलापूर हे







महाराष्ट्राच्या भूगोलातील एक अद्वितीय आणि वैभवशाली शहर आहे. इतिहास, संस्कृती, साहित्य, संतपरंपरा, उद्योग, कृषी आणि सामाजिक चळवळींनी सोलापूरला नेहमीच विशिष्ट ओळख दिली आहे. सोलापूर हे हजारो वर्षांचा इतिहास लाभलेले शहर आहे. विजयनगर, बहमनी, आदिलशाही, मुघल, पेशवे या सर्व




राजवटींनी येथे आपल्या छाप सोडल्या आहेत. धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्याही सोलापूर एक संगमस्थळ राहिले आहे. यास अनुसरून सर्वप्रथम विकास विस्ताराची क्षितीज दिसत आहे ते क्षेत्र म्हणजे पर्यटन वृद्धी.सोलापूरच्या धार्मिक व सांस्कृतिक वारशाला विमान सेवेचा मोठा फायदा होईल व पर्यटनाचा नवा मार्ग खुला होईल. भविष्यात पुणे, मुंबई, नागपूर, बेंगळुरु, हैदराबाद याठिकाणी थेट उड्डाणे सुरू झाल्यास सोलापूर हे व्यापार व पर्यटनाचे हब बनेल. तसेच पंढरपूरची वारी ज्यासाठी देश-विदेशातील लाखो भाविक सहज येऊ शकतील. याबरोबरच श्री सिद्धेश्वर



**प्रा. डॉ. नरेंद्र काटीकर**
इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन, नवी दिल्ली

मंदिर - श्री सिद्धेश्वर यात्रा. या यात्रेला जागतिक प्रसिद्धी मिळेल. सोलापूर भुईकोट किल्ला, ऐतिहासिक स्थळे, पुरातन वास्तू, महानुभाव पंथाची स्थळे, मंदिरे आणि विविध धार्मिक-सांस्कृतिक केंद्रे, देश-विदेशातील पर्यटकांसाठी सहज उपलब्ध होतील. अर्थातच यामुळे हॉटेल्स, गाईड सेवा, हस्तकला बाजार, सांस्कृतिक कार्यक्रमांना चालना मिळेल.

''विकास'' याबाबत विचार करता तो जसा आर्थिक व सामाजिक अंगाने आवश्यक असतो, त्याचबरोबर व्यक्तिगत अर्थाने त्याचा आर्थिक स्तर उंचावणे हाही एक मूलभूत घटक त्यामध्ये समाविष्ट असतो. यास अनुसरून व्यापारसुलभता (पान ४ वर...)

सुराज्य च्या वर्धापनदिनास शुभेच्छा
Knowledge is Power
Shanti Education Society's
**A. G. PATIL INSTITUTE OF TECHNOLOGY, SOLAPUR**
NAAC Accredited (2nd Cycle) | www.agpit.edu.in | 0217-2342499
ISO 9001:2015 Certified | Affiliated to DBATU, Lonere
Near Saiful, Opp. SRP Camp, Vijapur Road, Solapur (Maharashtra)
WE ARE NOW AN
**AUTONOMOUS INSTITUTE!**
(Granted Autonomous Status by UGC & DBATU)
*A Legacy of Excellence in Academics, Placements, Research, and Entrepreneurship!*




## समाजसेवेचा 'प्रिसिजन' पॅटर्न!

PRECISION

समाजाचं आपण काही देणं लागतो या कृतज्ञतेच्या भावनेतून प्रिसिजनने सामाजिक कार्याला प्रारंभ केला. सोलापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि विकासात्मक घडामोडींमध्ये प्रिसिजनचं योगदान देण्याचा प्रयत्न केला आहे.

- प्रकल्पांची संख्या - ११२
- गावांची संख्या - २७७
- लाभार्थी संख्या - १३,२४,८६७

- सन २००६ मध्ये प्रिसिजन फाउंडेशन या सामाजिक विश्‍वस्त संस्थेची स्थापना करून सामाजिक कामाला प्रारंभ केला. शिक्षण, आरोग्य, शाश्‍वत विकास आणि साहित्य, कला, संस्कृती या क्षेत्रात कार्य सुरू झाले.
- प्रिसिजनने काळाची गरज ओळखून डिजीटल शिक्षणावर भर दिला. गेल्या ९ वर्षात सोलापूर जिल्ह्यातील १४९ शाळांमधील १६६ वर्गखोल्यांमध्ये इंटरॅक्टिव्ह ई-लर्निंग किट बसवले.
- ई-लर्निंग किट बसवलेल्या शाळांमध्ये वीज पुरवठा खंडित होतो. त्यामुळे अशा शाळांमध्ये प्रिसिजनने सोलार पॅनल बसवून वीज पुरवठा अखंड राहील याची काळजी घेतली.
- विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव देणारा 'अविष्कार' प्रकल्प प्रिसिजनने राबविला. यासाठी विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी कार्यशाळा घेतल्या.
- विद्यार्थ्यांना शास्त्रीय गायन, वादन, नृत्य या कलांचा परिचय व्हावा या हेतूने प्रिसिजनच्या माध्यमातून 'बैठक ॲट स्कुल' हा उपक्रम राबविला जातो.
- वाचन आणि लेखनाची सवय वाढावी यासाठी प्रिसिजन आणि युनिक फिचर्स यांच्या माध्यमातून ८ शाळांमधून १००० हजार विद्यार्थ्यांसाठी 'पासवर्ड वाचन अभियान' राबविले जाते.
- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान शिकण्यासाठी पुरेशा प्रयोगशाळांची व्यवस्था नसते. प्रिसिजनने स्टेम लर्निंगच्या माध्यामातून जिल्ह्यातील पाच शाळांमध्ये 'मिनी सायन्स सेटंर'ची उभारणी केली.
- प्रिसिजनने रूग्णांची गरज लक्षात घेऊन सिव्हिल हॉस्पिटलमध्ये एक सुसज्ज असा हेमो डायलेसिसचा वार्ड तयार करून दिला. २०१८ पासून आजवर १२,९६० रूग्णांनी याचा लाभ घेतला आहे.
- डॉ. हेडगेवार रक्तपेढीला अत्याधुनिक सेंट्रिफ्यूग मशिन देण्यात आली. ही स्वयंचलित मशिन असल्याने मानवी हस्तक्षेपाला आणि चुकांना इथे वाव नाही.
- सोलापूरातील मार्कंडेय रूग्णालयास अत्याधुनिक सुविधा असलेली 'कार्डियाक ॲम्बुलन्स' देण्यात आली.
- चिंचणी हे पंढरपूर तालुक्यातील स्थलांतरीत गाव आहे. या गावातील सार्वजनिक पाणीपुरवठा यंत्रणा सौर ऊर्जेवर करण्यात आला आहे. तसेच या गावात सौर पथदिवे बसविण्यात आले.
- दक्षिण सोलापूर तालुक्यातील कासेगांव येथे प्रिसिजनच्या सी एस आर निधितून पुण्यातील सेवावर्धिनी या संस्थेच्या सहकार्याने जलसंर्वधन आणि व्यवस्थापन प्रकल्प राबविला जात आहे.
- दरवर्षी सामाजिक क्षेत्रात निरपेक्षपणे कार्य करणाऱ्या संस्थांना 'प्रिसिजन सामाजिक पुरस्काराने' गौरविले जाते. आजवर ३० संस्थांना हे पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.











# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

# सोलापूर जिल्ह्याचा शैक्षणिक मानदंड

महाराष्ट्राच्या उच्च शिक्षण व्यवस्थेमध्ये सध्या एकूण आठ प्रमुख प्रकारच्या संस्थांचा समावेश आहे. या शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व व्यावसायिक शिक्षणाच्या संधीची पूर्तता करतात.

**(१) राज्य विद्यापीठे :** महाराष्ट्रात आजघडीला एकूण १८ राज्य विद्यापीठे आहेत. सार्वजनिक निधीतून ही विद्यापीठे चालतात. विविध शाखांमध्ये पदवी व पदव्युत्तर शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचे कामही विद्यापीठे करतात.

**(२) क्लस्टर विद्यापीठे :** एकाच संस्थेच्या तीन ते चार महाविद्यालयाचे एकत्रीकरण करून स्थापन झालेली ही क्लस्टर विद्यापीठे आहेत. ही विद्यापीठे एकूण चार आहेत. शैक्षणिक सहकार्य वाढवण्यास आणि संसाधनाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासही विद्यापीठे मदत करतात.

**(३) खासगी विद्यापीठे :** उद्योगाभिमुख शिक्षण, तंत्रज्ञान आधारित अभ्यासक्रम आणि व्यावसायिक शिक्षणाच्या संधी यावर अधिक व्यापक प्रमाणात भर देणारी खाजगी विद्यापीठे आहेत. अशी एकूण २२ विद्यापीठे महाराष्ट्रात आहेत.

**(४) स्वायत्त संस्था :** शैक्षणिक लवचिकता आणि संशोधन उत्कृष्टतेसाठी प्रसिद्ध असलेल्या अशा संस्थांना स्वायत्त संस्था म्हणून संबोधले जाते. आजमितिला एकूण ९५ संस्था या स्वायत्त संस्था/महाविद्यालये आहेत.

**(५) कौशल्य विद्यापीठ :** उद्योगांच्या मागणीनुसार त्यांना हवे असलेले कौशल्ययुक्त विद्यार्थी तयार होण्यासाठी, या विद्यार्थ्यांना कौशल्याधिष्ठित शिक्षण मिळावे या हेतूने एका कौशल्य विद्यापीठाची निर्मिती झालेली आहे.



**(६) मुक्त विद्यापीठ :** काही विद्यार्थ्यांना नियमित वर्गामध्ये उपस्थित राहून शिक्षण घेता येत नाही. अशा विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय व्हावी, कोणताही विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहू नये याकरिता मुक्त विद्यापीठाची निर्मिती करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील एकमेव मुक्त विद्यापीठ नाशिक येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नावाने सुरू आहे.

**(७) मराठी भाषा विद्यापीठ :** मराठी भाषा आणि साहित्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी शासनाने मराठी भाषेसाठी स्वतंत्र विद्यापीठाची स्थापना केली आहे.

**(८) केंद्रीय विद्यापीठ :** राष्ट्रीय स्तरावर उच्च शिक्षण आणि संशोधनाच्या संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून केंद्रीय विद्यापीठाची स्थापना करण्यात येते. वर्धा येथे महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ हे केंद्रीय विद्यापीठ म्हणून महाराष्ट्रामध्ये स्थापित झाले आहे. संपूर्ण भारतात सोलापूर या एका जिल्ह्यासाठी लाभलेले एकमेव सार्वजनिक विद्यापीठ म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ होय.

असे केवळ एका जिल्ह्याकरिताच हे विद्यापीठ स्थापन झाल्याने महाराष्ट्र व भारतात सोलापूर जिल्ह्याचे नाव शैक्षणिक क्षेत्रात अग्रक्रमाने घेतले जात आहे. या विद्यापीठाची वाटचाल ही शासन, विविध शैक्षणिक संस्थाचे अध्यक्ष, संस्थाप्रतिनिधी, महाविद्यालयांचे प्राचार्य, शैक्षणिक संकुलाचे संचालक, विविध संघटनांचे पदाधिकारी, विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणांचे सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक, विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडियाचे प्रतिनिधी, पत्रकार या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरित्या सुरू आहे.

> **संपूर्ण भारतात सोलापूर या एका जिल्ह्यासाठी लाभलेले एकमेव सार्वजनिक विद्यापीठ म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ होय. असे केवळ एका जिल्ह्याकरिताच हे विद्यापीठ स्थापन झाल्याने महाराष्ट्र व भारतात सोलापूर जिल्ह्याचे नाव शैक्षणिक क्षेत्रात अग्रक्रमाने घेतले जात आहे. या विद्यापीठाची वाटचाल ही शासन, विविध शैक्षणिक संस्थाचे अध्यक्ष, संस्थाप्रतिनिधी, महाविद्यालयांचे प्राचार्य, शैक्षणिक संकुलाचे संचालक, विविध संघटनांचे पदाधिकारी, विद्यापीठाच्या सर्व प्राधिकरणांचे सदस्य, प्राध्यापक, विद्यार्थी, पालक, विविध प्रिंट व इलेक्ट्रॉनिक मिडियाचे प्रतिनिधी, पत्रकार या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीरित्या सुरू आहे.**

**(१) विद्यापीठाला आतापर्यंत लाभलेले कुलगुरू :-**

विद्यापीठाला आतापर्यंत एकूण नऊ कुलगुरू लाभले आहेत. त्यापैकी पाच नियमित कुलगुरू असून चार कुलगुरूंकडे तात्पुरता प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यभार देण्यात आलेला होता.

डॉ.ईरेश स्वामी यांची विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू म्हणून नेमणूक झाली होती. त्यांचा कार्यकाळ दिनांक २४ जुलै २००४ ते १० सप्टेंबर २००७ असा होता. डॉ. स्वामी यांच्यानंतर डॉ. एन. एन. मालदार यांच्याकडे दिनांक ११ सप्टेंबर २००७ ते २५ नोव्हेंबर २००७ या काळात प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यभार होता.

डॉ.बाबासाहेब बंडगर यांची विद्यापीठाचे दुसरे नियमित व पूर्णवेळ कुलगुरू म्हणून दिनांक २६ नोव्हेंबर २००७ ला निवड झाली. त्यांनी दिनांक ते २५ नोव्हेंबर २०१२ या कालावधीत कुलगुरूपदाचा कार्यभार सांभाळला.

डॉ. बाबासाहेब बंडगर यांच्यानंतर शिवाजी विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू प्रा. डॉ. एन. जे. पवार यांच्याकडे प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यभार देण्यात आला. डॉ. पवार सरांनी प्रभारी कुलगुरू म्हणून दिनांक २६ नोव्हेंबर २०१२ ते १० डिसेंबर २०१२ पर्यंत कामकाज पाहिले.

प्रा. डॉ. एन. एन. मालदार



**डॉ. शिवाजी शिंदे**
**सहायक कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

हे विद्यापीठाचे तिसरे नियमित व पूर्णवेळ कुलगुरू म्हणून निवडल्या गेले. त्यांचा कार्यकाळ दिनांक ११ डिसेंबर २०१२ ते १० डिसेंबर २०१७ असा होता. डॉ. मालदार यांच्यानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे तत्कालीन कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांच्याकडे दिनांक १० डिसेंबर २०१७ ते ६ मे २०१८ पर्यंत प्रभारी कुलगुरू कार्यभार होता.

डॉ. मृणालिनी फडणवीस यांची विद्यापीठाच्या पहिल्या महिला कुलगुरू म्हणून नेमणूक झाली.

(पान ५ वर...)

---

## व्यावसायिक दृष्टीकोनातून सोलापूर

पान २ वरुन ...



वाहन चालक प्रशिक्षण स्कूल्स, वाहन दुरुस्ती आणि देखभाल व्यवसाय, पेट्रोल पंप्स, इलेक्ट्रिक वाहन चार्जिंग स्टेशन्स, फॅब्रीकेशन आणि बॉडी शॉप, माल वाहतूक आणि पायाभूत सुविधा क्षेत्र, बॅटरी डीलर्स आणि मोटार वाहन विमा देणाऱ्या कंपन्या शहर आणि परिसरात निर्माण झाल्या असून भविष्यात या क्षेत्राच्या वाढीला मोठ्या संधी आहेत. हे क्षेत्र जवळपास नऊ ते दहा प्रकारच्या सेवा देत असून त्याद्वारे हजारो लोकांच्या रोजगार निर्मितीचे चक्र गतीमान होण्यास मदत होत आहे. यापैकी केवळ वाहन दुरुस्ती व्यवसायात शहरात जवळपास ७०० हून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. भविष्यातील सोलापूर शहराच्या वैभवात भर घालणारे हे क्षेत्र असून उत्पादन प्रक्रिया सोलापुरात सुरु झाल्यास सोलापूरच्या सर्वांगीण विकासातील एक महत्वपूर्ण क्षेत्र ठरू शकते. वरील सर्व घटकांचा एकत्रित विचार करता, येणारा भविष्यकाळ सोलापूर आणि एकूणच जिल्ह्याच्या अर्थकारणाच्या दृष्टीकोनातून सुवर्णकाळ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## सोलापूरची विमान सेवा व आयटी इंडस्ट्री

# विकासाचे नवे क्षितिज

पान ३ वरुन ...

यामध्ये वस्त्रोद्योग, भाजीपाला निर्यात, बियाणे उद्योग, दगडी शिल्पे यांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत पोहोचणे सोपे होईल. तसेच वेगवान संपर्क साधन म्हणून मुंबई, पुणे, हैदराबाद अशा महानगरांशी काही तासांत थेट संपर्क साधता येईल. यामुळे व्यवसाय, शिक्षण व वैद्यकीय क्षेत्रातील लोकांना मोठा फायदा होईल. ज्यामध्ये गुंतवणूक आकर्षण या अर्थाने विमान सेवा उपलब्ध असल्यामुळे देशी–विदेशी गुंतवणूकदारांना शहरात नवी उद्योगसंस्था स्थापन करण्याचा विश्वास बसेल. शिक्षण व आरोग्य यास अनुसरून महानगरांतील शैक्षणिक कार्यक्रम व वैद्यकीय सुविधा अल्प वेळेत गाठता येतील.

**आयटी इंडस्ट्रीचे महत्व: .**

ज्ञानाधारित अर्थव्यवस्था व रोजगारनिर्मिती. आधुनिक युगात आयटी हा सर्वात वेगाने वाढणारा उद्योग आहे. पुणे, बेंगळुरु, हैदराबाद ही शहरे आयटीमुळे जगप्रसिद्ध झाली आहेत. सोलापूरमध्ये आयटी उद्योग वाढण्यासाठी भरपूर संधी आहेत. आयटी इंडस्ट्रीबाबत सोलापूरमध्ये अद्याप प्राथमिक टप्प्यातील हालचाली दिसतात. काही स्टार्टअप कंपन्या, तंत्रज्ञानाशी निगडित सेवा पुरवणाऱ्या संस्था कार्यरत आहेत. येथे अनेक अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालये उत्कृष्ट दर्जाचे मनुष्यबळ तयार करतात. परिश्रमी, सर्जनशील आणि कमी खर्चिक तरुण येथे उपलब्ध आहेत. यामुळे आयटी इंडस्ट्रीसाठी आवश्यक मनुष्यबळ सहज उपलब्ध होईल. शैक्षणिक प्रगती म्हणून आयटी क्षेत्राच्या मागणीमुळे अभियांत्रिकी, संगणकशास्त्र, डिझाईन, डेटा सायन्स इत्यादी शिक्षणाला चालना मिळेल. सोलापूर हे पुणे, बेंगळुरु आणि हैदराबाद यांच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याने कनेक्टिव्हिटी उत्तम आहे. शहरात डिजिटल साक्षरतेचा स्तर वाढत आहे, ई–गव्हर्नन्स व ऑनलाईन सेवा मोठ्या प्रमाणावर स्वीकारल्या जात आहेत. यायोगे ग्रामीण भागातील डिजिटायझेशन या सगळ्यांना आयटी इंडस्ट्री प्रेरणा देईल. जर येथे आयटी पार्क, इनक्युबेशन सेंटर, स्टार्टअप हब, क्लाउड सेवा केंद्रे स्थापन झाली तर सोलापूर हे ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेचे केंद्र होईल. आयटी क्षेत्रात अद्याप प्रारंभीचा टप्पा आहे. काही स्टार्टअप्स, डिजिटल सेवा पुरवणाऱ्या कंपन्या कार्यरत आहेत. शैक्षणिक संस्था आयटी अभ्यासक्रम वाढवून विद्यार्थ्यांना तयार करत आहेत. हीच बीजे पुढील मोठ्या उद्योगवाढीस कारणीभूत ठरतील. यायोगे स्थानिक तरुण–तरुणींना आपल्या गावीच रोजगार उपलब्ध होईल व स्थलांतर कमी होईल.

**वर्तमानस्थिती व सकारात्कमक बदल:**

आज सोलापूरमध्ये विमानतळाची सुविधा उपलब्ध असून नियमित प्रवासी विमानसेवा सुरु करण्यासाठी केंद्र सरकार, नागरी विमान वाहतूक मंत्रालय, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांनी एकत्रितपणे प्रयत्न केले आहेत. याबरोबरच काही प्रमाणात चार्टर फ्लाइट्स, प्रशिक्षण उड्डाणे सुरू असून लवकरच नियमित व्यावसायिक उड्डाणे इतर सर्व महत्वपूर्ण शहरांसाठी सुरू होतील, अशी अपेक्षा आहे. औद्योगिक क्षेत्रात सोलापूरचा वस्त्रोद्योग हा प्रमुख पाया आहे. ''सोलापुरी चादर'' आणि ''सोलापुरी टॉवेल'' या जगभर प्रसिद्ध आहेत. याशिवाय दगडी शिल्पकला, शेतीमाल प्रक्रिया उद्योग, बियाणे उद्योग यांनी सोलापूरची अर्थव्यवस्था मजबूत केली. विमानसेवा व आयटी इंडस्ट्रीमुळे सोलापूरच्या अर्थव्यवस्थेत नवे परिमाण निर्माण होतील. औद्योगिक वृद्धी म्हणून विमानसेवा व आयटी इंडस्ट्रीमुळे परंपरागत उद्योगांना आधुनिक बाजारपेठ उपलब्ध होईल. याबरोबरच वस्त्रोद्योग, कृषी उत्पादन, दगडी शिल्पे यांची जागतिक बाजारपेठेत निर्यात वाढ पोहोच होईल.. सेवाक्षेत्र वृद्धी हॉटेल, पर्यटन, वाहतूक, बँकिंग, शिक्षण व वैद्यकीय क्षेत्र यामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ होईल. नागरिकांचे प्रतिव्यक्ती उत्पन्न वाढेल व जीवनमान उंचावेल. रोजगारनिर्मिती हजारो तरुण–तरुणींना थेट व अप्रत्यक्ष नोकऱ्या मिळतील. मोठ्या महानगरांच्या क्षमतांवर त्यांच्या त्यांच्या मर्यादेची बाजू वरचढ झाल्यामुळे, आता संपूर्ण उद्योग विश्व हे दुसऱ्या स्तरावरील शहरांकडे लक्ष केंद्रित करत असून त्या ठिकाणच्या क्षमता व मर्यादा लक्षात घेता तिथे उद्योग व्यवसाय यश निश्चिती खात्री लायक आहे, असा अभ्यास सांगतो. विकास हा शाश्वत विकास म्हणूनच आवश्यक असतो त्या नियोजनातून पर्यावरणपूरक विमानतळ, हरित आयटी पार्क्स, नवीकरणीय ऊर्जा वापर यामुळे अशी शाश्वत प्रगती साधता येईल.



सोलापूरची विमानसेवा आणि आयटी इंडस्ट्री ही केवळ सुविधा किंवा उद्योग नाहीत, तर सोलापूर या दोन्ही क्षेत्रांत झेप घेण्यासाठी सक्षम आहे व संपूर्ण शहराच्या नव्या ओळखीचे प्रतीक असतील. यामुळे येत्या दशकात सोलापूर हे नाव ज्ञान, तंत्रज्ञान आणि जागतिक संपर्क या तिन्ही क्षेत्रांत अग्रस्थानी राहील. येथील भौगोलिक स्थान, औद्योगिक वारसा, आर्थिक विकास, सामाजिक परिवर्तन, शैक्षणिक संधी–साधनसामग्री, सांस्कृतिक परंपरा आदानप्रदान आणि जागतिक स्तरावरील संपर्क, या सगळ्यांचा मेळ घातला तर सोलापूरला नवे विकासाचे क्षितिज खुललेले दिसते. ज्यामुळे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक सर्वच क्षेत्रात सकारात्मक बदल घडतील. भविष्यकाळात जेव्हा आपण सोलापूरकडे पाहू, तेव्हा ते केवळ एक शहर नसेल, तर ते विकास, प्रगती आणि प्रेरणा यांचे प्रतीक असेल.

# पंढरपूर काल आज आणि उद्या

जेव्हा नव्हती गोदा गंगा, तेव्हा होती चंद्रभागा आणि जेव्हा नव्हते चराचरा केव्हा होते पंढरपूर, असे संतांनी वर्णन केलेले पंढरपूर म्हणजे श्री संत शिरोमणी नामदेव महाराजांनी वर्णिल्याप्रमाणे अनादी अनंत काळाची साक्ष आहे. याचाच अर्थ श्री क्षेत्र पंढरपूर हे जुने पुराणे असून संतांच्या विचारधारांनी श्रीक्षेत्र बनलेले असे प्राचीन पुरातन क्षेत्र. श्री विठ्ठल– रुक्मिणीच्या वास्तव्याने पुनीत झालेले पवित्र क्षेत्र आहे. माझे माहेर पंढरी म्हणत प्रत्येक महिन्याच्या शुद्ध एकादशीला पंढरपूर येथे वारकऱ्यांची मांदियाळी विठ्ठल नामाच्या भक्तीने वारीसाठी नियमित येत असतात. ही परंपरा महिन्याची असते याशिवाय आषाढी, कार्तिकी, माघ, चैत्री या चार मोठ्या वाऱ्यांना पंढरपुरात वारकऱ्यांचा महासागर पहावयास मिळतो. या गर्दीच्या प्रवाहात पुढे पुढे आपोआप वाहत जाऊन श्री विठ्ठलाचे सावळे सुंदर रूप पाहताच सारा शिणवटा निघून जातो. श्री विठ्ठलाचे चरणावर माथा–टेकताच याचसाठी केला होता.याजसाठी केला होता अट्टाहास म्हणून जो तो कृतार्थ होतो. मग गरुड खांबाला आलिंगन देत दोन्ही कान पकडून जणू काही क्षमा याचना करीत हेच दान देगा देवा तुझा विसर न व्हावा, अशी आराधना करीत घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनी पाहीन रूप तुझे म्हणत पंढरीचा वारकरी म्हणून घेतला वसा उतत नाही मातत नाही. या भक्तीमय विचारांचा वारसा पिढ्यांपिढ्या जोपासला जाऊ लागला हे चित्र काल आज आणि उद्याही पंढरपूर बाबत चालतच राहणार हे त्रिकालाबाधित सत्य आहे. यातूनच माझे माहेर पंढरी आहे भिवरेच्या माझी बहीण चंद्रभागा करीत असे बाप भंगा या विचारांचा वारसा घेऊन पिढ्यान पिढ्या जोपासला जाऊ लागला.





श्री विठ्ठलाचे चरणावर माथा–टेकताच याचसाठी केला होता.याजसाठी केला होता अट्टाहास म्हणून जो तो कृतार्थ होतो. मग गरुड खांबाला आलिंगन देत दोन्ही कान पकडून जणू काही क्षमा याचना करीत हेच दान देगा देवा तुझा विसर न व्हावा, अशी आराधना करीत घालीन लोटांगण वंदीन चरण डोळ्यांनी पाहीन रूप तुझे म्हणत पंढरीचा वारकरी म्हणून घेतला वसा उतत नाही मातत नाही. या भक्तीमय विचारांचा वारसा पिढ्यांपिढ्या जोपासला जाऊ लागला हे चित्र काल आज आणि उद्याही ...

पूर्वीच्या पंढरपुरात मंदिर परिसर म्हणजे फरशी वरचा भाग होता. तेव्हा छोटे छोटे गल्ली बोळ मोठ्या प्रमाणात होते. त्याचा भाविकांना व नागरिकांना रहदारीचा त्रास होऊ लागला. महिन्याची एकादशी व यात्रा कालावधी धक्काबुक्की होऊन चेंगराचेंगरीच्या घटना होऊ लागल्या या त्रासातून मुक्तता व्हावी म्हणून १९८० च्या दशकात सर्वप्रथम तेव्हाचे प्रांताधिकारी रमाकांत झा यांनी मास्टर प्लॅन राबवला. त्यामुळे पंढरपुरातील गल्लीबोळे व अरुंद रस्ते रुंद झाले. दगडी फरशी जाऊन चालावयास सुलभ रस्ते झाले, पण वाहतुकीच्या सुविधेमुळे पंढरपुरात दररोज येणारी गर्दी वाढू लागली. आषाढी वारीत १५ लाखाच्या वर भाविक पांडुरंगाच्या दर्शनाला येऊ लागली. परिणामी रुंद रस्ते पुन्हा अरुंद दिसू लागले. म्हणून पुन्हा रस्ता रुंदीकरण कॉरिडोर हा विकासात्मक प्रकल्प सरकारने देवू केला आहे. कॉरिडॉरमुळे पंढरपूरचे रूपडे पालटणार आहे.तेव्हा पंढरपूरकरांनी चालून आलेला विकास नाकारूच नये.त्यांच्या भावना रास्त असतील. पंढरपूरच्या लोकप्रतिनिधींनी बाधित नागरिकांच्या भावना ऐकून त्यांना योग्य मोबदला मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.पंढरीत येणाऱ्या भाविकांना चांगल्या सुविधा मिळण्यासाठी आणि पंढरपूरचा व्यापार अजून वृद्धींगत होण्यासाठी अशा कॉरीडॉरची गरज आहेच. पंढरपूरचे अर्थकारण म्हणजे व्यापार आणि साखर कारखादारी.

शतकानुशतके वारी चालत आली आहे.या वारीने लहान–मोठ्या व्यापाऱ्यांना रोजगार दिला आहे. त्यावर कितीतरी पिढ्यांची गुजराण झाली आणि यापुढेही ती राहील.कुंकू ,हळद,बुक्का,चिरमुरे,बत्ताशे,गुलाल, तुळशीच्या माळा हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात चालतो.भजन–कीर्तन आणि शास्त्रीय वाद्यांची देखील विक्री मोठ्या प्रमाणात होत असते.वारीच्या वेळी बाहेरून येणारे लोकही व्यापार करून मोठी कमाई करून जात असतात.मूर्तींची विक्री मोठ्या प्रमणात होते.कलावंतही त्यावरच आपली गुजराण चालवतो.सर्वात महत्वाची बाब म्हणजे अगदी लहान मुले गर्दीच्या ठिकाणी गोपीचंदन




**राजेश कदम**

**पंढरपूर–प्रतिनिधी**


व बुक्का लावून दक्षिणा कमावत असतात.श्रीविठुराया पंढरपूरकरांना अजून काय द्यायला पाहिजे. १९८० ला झालेल्या मास्टर प्लॅनमुळे रेल्वे रुळाखाली असणारे पंढरपूर असंख्य उपनगरात विभागले गेले व पंढरपूर शहर इसबाबी टाकळी, कासेगाव या रस्त्याावर विभागले गेले.याचाच अर्थ असा की,पंढरपूरची वाढ होते आहे.

१९८४ पूर्वी दुष्काळग्रस्त म्हणून ओळख असलेल्या पंढरपूर तालुक्याला उजनी धरणाचे पाणी आल्यामुळे पंढरपूरकरांसाठी उजनी धरण वरदायिनी ठरले. ज्वारी व रब्बी पिकाची लागवड होणाऱ्या पंढरपुरात उसाची लागवड मोठ्या प्रमाणात होऊ लागली. त्याचबरोबर द्राक्ष, डाळिंब पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होऊ लागले. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखाना गुरसाळे, पांडुरंग सहकारी साखर कारखाना श्रीपूर, चंद्रभागा सहकारी साखर कारखाना वसंत नगर भाळवणी या

(पान ७ वर...)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
# सोलापूर जिल्ह्याचा शैक्षणिक मानदंड

**पान ४ वरुन ...**

त्यांचा कार्यकाळ ६ मे २०१८ ते ५ मे २०२३ पर्यंत होता. डॉ. फडणवीस यांच्यानंतर डॉ. होमी भाभा स्टेट युनिव्हर्सिटी मुंबईचे कुलगुरू डॉ. रजनीश कामत यांच्याकडे प्रभारी कुलगुरू म्हणून दिनांक ५ मे २०२३ ते ६ ऑक्टोबर २०२३ असा प्रभारी कुलगुरू पदाचा कार्यभार होता. आता प्रा. डॉ. प्रकाश महानवर हे दिनांक ६ ऑक्टोबर २०२३ पासून विद्यापीठाचे पाचवे नियमित व पूर्णवेळ कुलगुरू म्हणून कार्यरत आहेत.

**(२) नाविन्यपूर्ण व रोजगाराभिमुकख अभ्यासक्रम :-**

विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार विविध विद्याशाखांतर्गत येणाऱ्या विषयांचे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम पूर्ण करणारे विद्यार्थी आपले भविष्य उज्वल करतील, असा आशावाद आहे. या अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांच्या जीवनात नक्कीच उपयोग होईल आत्मनिर्भर भारत बनवण्याकरिता याचा लाभ होणार आहे.

**(३) कौशल्य विकास केंद्राचे कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम:-**

शिक्षणातून केवळ नोकरी मिळवणारे विद्यार्थी तयार न होता नोकरी देणारे विद्यार्थी अर्थात उद्योजक निर्माण व्हावेत या उद्देशाने विद्यापीठात जवळपास १४५ ह कौशल्याधारित विविध प्रमाणपत्र व पदविका अभ्यासक्रम सुरू केले आहेत. हे अभ्यासक्रम ३ महिने, ६ महिने, एक वर्ष अशा अल्प कालावधीचे असून यामध्ये नाविन्यता व विविधता आहे. हे कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम पूर्ण करून विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहावेत हा विद्यापीठाचा हेतू आहे.

**(४) विविध अध्यासनाची निर्मिती :-**

आपल्या समाजाला दिशा देणाऱ्या थोर महापुरुषांच्या विचारांचा व कार्याचा संशोधनात्मक अभ्यास व्हावा, या महापुरुषांचे विचार आणि कार्य पुढील पिढ्यांना अवगत व्हावे या उद्देशाने विद्यापीठांमध्ये एकूण पाच अध्यासनांची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन, महात्मा बसवेश्वर अध्यासन, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन, लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे अध्यासन, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन यांचा समावेश आहे.

वरील ५ अध्यासनांपैकी केवळ दोन अध्यासन केंद्रांना शासनाचा निधी प्राप्त झाला आहे. तर तीन अध्यासने ही विद्यापीठ निधीतून सुरू आहेत.

**(५) नवोपक्रम नवसंशोधन व साहचार्य मंडळामार्फत सहाय्य व प्रोत्साहन :-**

विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना संधी मिळावी, त्यांच्या नवकल्पनांना अवकाश प्राप्त व्हावे यासाठी विद्यापीठाच्या नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळामार्फत स्टार्टअपकरिता आर्थिक सहाय्य व प्रोत्साहन दिले जाते. यातून आर्थिक मदतीबरोबरच विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना उत्तेजन मिळावे, त्यांच्यात सृजनशीलता निर्माण व्हावी हा महत्वाचा उद्देश या पाठीमागे आहे.

**(६) विविध आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय संस्थाबरोबर सामंजस्य करार :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ हे आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय व राज्य पातळीवरील गुणवत्तापूर्ण कामगिरी करणारी विद्यापीठे व शैक्षणिक संस्था यांच्याशी जोडले जावे, आपापसात ज्ञानाची व विचारांची देवाण–घेवाण व्हावी आणि विद्यापीठाचा गुणात्मक विकास व्हावा या निर्भेळ हेतूने अनेक शैक्षणिक, सामाजिक, औद्योगिक, साहित्यिक, आर्थिक संस्थांशी जवळपास १०८ सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये दक्षिण कोरिया, फिनलँड, माल्टा, चीन, मलेशिया, श्रीलंका यासारख्या देशांबरोबरच आणि भारतातल्या व महाराष्ट्रातल्या नावाजलेल्या शैक्षणिक संस्था व विद्यापीठाबरोबर विद्यापीठाने सामंजस्य करार केलेले आहेत.

**(७) संशोधनाला चालना देणारे विद्यापीठ :-**

विद्यापीठाकडून सातत्याने नवनवीन संशोधने, पेटेंट, संशोधन प्रकल्प यासाठी प्रोत्साहन देण्यात येत असून याकरिता विविध तज्ञांचे मार्गदर्शन, व्याख्याने याचे आयोजन करून प्राध्यापकांना प्रशिक्षण दिले जात आहे. त्याबरोबरच विद्यापीठाने आतापर्यंत एकूण ९ पीएच.डी प्रवेश परीक्षा घेतल्या असून यामुळे अनेक संशोधक विद्यार्थ्यांना संशोधन करण्याची मोलाची संधी मिळाली आहे. महाराष्ट्रातील इतर सर्वच विद्यापीठापैकी सर्वात जास्त पीएच.डी. प्रवेश परीक्षा विद्यापीठाकडून घेण्यात आहेत.

**(८) विद्यापीठाचा सार्थ नामविस्तार :--**

दिनांक ६ मार्च २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये विद्यापीठाला कुशल प्रशासक व थोर राज्यकर्त्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव देण्यात आले आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवींच्या विचारांची आणि कार्याची सदोदित प्रेरणा सोबत घेऊन विद्यापीठातील प्रत्येक घटक या ठिकाणी काम करत आहे. अहिल्यादेवींच्या न्याय, समता, बंधुता, सर्वांप्रती आदरांची भावना या मूल्यांची जपणूक करण्याचे काम येथील प्रत्येकजण करीत आहे. विद्यापीठाला पुण्यश्लोक अहिल्यादेवींचे नाव देऊन शासनाने हा सार्थ नामविस्तार केला आहे, असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.



**(९) कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उत्तुंग भरारी :-**

महाराष्ट्रातील ज्या विद्यापीठांना पन्नास ते शंभर वर्ष स्थापनेचा इतिहास आहे. अशा विद्यापीठाच्या तुलनेने केवळ २० – २१ वर्षांच्या कालावधीत अतिशय नवख्या व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन विद्यापीठाने कला, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उत्तुंग भरारी घेतली आहे.

३८ वा पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ युवा महोत्सव गणपत विद्यापीठ महसाना, गुजरात येथे दि.०४ ते ०८ जानेवारी २०२५ दरम्यान संपन्न संपन्न झाला.या मोहत्सवात गुजरात आणि महाराष्ट्रातील एकूण ४४ विद्यापीठे सहभागी झालेली होती .स्पर्धा अत्यंत चुरशीच्या झाल्या.या महोत्सवात विद्यापीठाच्या संघाने उत्तम कामगिरी केली. एकूण पाच पारितोषिके मिळवत नेत्रदिपक यश मिळवले आहे. यामध्ये –

१.मिमिक्री–प्रथम क्रमांक –जैद शेख, २.पोस्टर –व्दितीय क्रमांक–निसर्ग लोहार, ३.कार्टुनिंग–तृतीय क्रमांक–निसर्ग लोहार, ४.एकांकिका–तृतीय क्रमांक, ५.नाट्य गट–सर्वसाधारण विजेतेपद, विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच कोणत्यातरी गटात सर्वसाधारण विजेतेपद प्राप्त झाले आहे. ही विद्यापीठाची पश्चिम विभागीय युवा महोत्सवातील आजपर्यंतची सर्वोत्तम कामगिरी आहे. जिंकलेले सर्व कलाप्रकार राष्ट्रीय युवा महोत्सवात सहभागी झाले.

अखिल भारतीय विश्वविद्यालय संघ,नवी दिल्ली अंतर्गत ३८ वा राष्ट्रीय आंतरविद्यापीठीय युवा महोत्सव अमिटी विद्यापीठ,नोएडा येथे दिनांक ०३ ते ०७ मार्च २०२५ दरम्यान संपन्न झाला. देशातील आठ विभागातून जिंकलेल्या १२२ विद्यापीठाचे प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक प्राप्त संघ या राष्ट्रीय महोत्सवात सहभागी झाले होते.

या महोत्सवात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठाने इतिहास रचला आहे. गेल्या वीस वर्षातील विद्यापीठाच्या इतिहासातील राष्ट्रीय पातळीवरील ही सर्वोत्तम कामगिरी आहे. एकूण पाच पारितोषेके मिळवून ऐतिहासिक यश प्राप्त केले आहे. यापूर्वी एकाच वेळी एवढी आणि सांघिक कलाप्रकारात पारितोषिके मिळाली नव्हती. या महोत्सवात पुढील पारितोषिके प्राप्त झाली आहे.

१.मिमिक्री–तृतीय क्रमांक –जैद शेख, २.पोस्टर –व्दितीय क्रमांक–निसर्ग लोहार, ३.कार्टुनिंग–तृतीय क्रमांक–निसर्ग लोहार,
४.एकांकिका–प्रथम क्रमांक (सामूहिक),
५.शोभायात्रा–प्रथम क्रमांक (सामूहिक) इत्यादी.

राजभवन, मुंबई येथे आयेजित इंद्रधनुष्य महोत्सवात विद्यापीठ संघाने देदीप्यमान कामगिरी केली. या महोत्सवात महाराष्ट्रातील २६ विद्यापीठे सहभागी झाली होती. त्यात पुण्याश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाने एकूण ०६ पारितोषिके मिळवली आहेत. प्रथमच सामूहिक कलाप्रकारात विद्यापीठाने इतकी पारितोषिके मिळवली याचा आनंद आहे.

ललितकला – १.शॉर्ट फिल्म–द्रितीय क्रमांक(सामुहिक) २.पोस्टर–प्रथम क्रमांक–निसर्ग लोहार (वैयक्तिक) एकूण दोन पारितोषिके, वाड्मय – १. वक्तृत्व–व्दितीय क्रमांक–उत्कर्ष क्षीरसागर (वैयक्तिक), नाट्य – १.मिमिक्री–प्रथम क्रमांक–जैद शेख (वैयक्तिक), २. एकांकिका–तृतीय क्रमांक (सामुहिक), नृत्य– १.लोकनृत्य–तृतीय क्रमांक (सामुहिक)अशी एकूण सहा पारितोषिके विद्यापीठ संघाने मिळवून ऐतिहासिक कामगिरी केली.

**(१०) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी :-**

महाराष्ट्र शासनामार्फत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी करण्यासंदर्भात अनेक सूचना, शासन निर्णय व परिपत्रक प्राप्त होत होती. त्यानुसार या सर्वांचे पालन करून तसेच स्कूल कनेक्ट कार्यक्रम १ व २ राबवून, विविध परिषदा, कार्यशाळा आणि परिसंवादाचे यशस्वी आयोजन केले आहे.

विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व विद्यापीठ संकुलातील सुरू असलेल्या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० लागू करण्यात आले आहे. त्यानुसार अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली असून सर्व अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**(११) शिक्षकांना संशोधन प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य :-**

यापूर्वी विद्यापीठ अनुदान आयोगाकडून महाविद्यालयीन व विद्यापीठीय प्राध्यापकांना संशोधन प्रकल्पासाठी आर्थिक सहाय्य केले जात होते. परंतु मध्यंतरी हे अनुदान देण्याचे बंद करण्यात आले आहे. अनेक होतकरू, गरजू व गुणवत्तापूर्ण संशोधन करणाऱ्या संशोधकांना आपले संशोधन पूर्ण करताना आर्थिक मदतीची आवश्यकता असते. हे लक्षात घेऊन विद्यापीठाने आणि या दोन योजना विद्यापीठ निधीतून सुरु केल्या आहेत. शिक्षकांच्या संशोधन प्रकल्पाला अनुदान देण्याचे काम सुरू झाल्याने प्राध्यापकांचे देखील हित विद्यापीठाने साधले आहे. त्यामुळे अशा प्राध्यापकांना याची खूप मदत झाली आहे.

**(१२) भव्य प्रशासकीय व परीक्षा भवन इमारतीची उभारणी :**

विद्यापीठाच्या ४८२ एकर जागेत विद्यापीठाची भव्य अशी नूतन प्रशासकीय व परीक्षा भवन इमारत तयार आहे. या इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले आहे. माननीय कुलगुरू डॉ. प्रकाशजी महानवर यांचा या इमारतीच्या उद्घाटन सोहळा भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याचा मनोदय आहे. त्यानुसार सदर इमारत उद्घाटनाच्या प्रतीक्षेत आहे.

**(१३) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांचे प्रेरणादायी व तेजस्वी स्मारक :**

मुत्सदी राजकारणी, शूरवीर, कर्तबगार व उत्तम प्रशासक असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांचा आणि कार्याचा प्रसार आणि प्रचार व्हावा, नवीन पिढीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि विचार अवगत व्हावे. या उदात्त भावनेतून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे प्रेरणादायी व तेजस्वी स्मारक उभारण्यात आले असून अल्पावधीतच या स्मारकाचे उद्घाटन देखील मोठ्या थाटामाटात करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

**(१४) विद्यापीठाशी संलग्न व स्वायत्त महाविद्यालये :**

विद्यापीठ कार्यक्षेत्रात आजमितिला एकूण ११४ संलग्न व स्वायत्त महाविद्यालये सुरू आहेत. त्यामध्ये एकूण सहा संलग्न महाविद्यालयांनी शासनाकडून स्वायत्तता मिळवली आहे. त्याामध्ये – (१) कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर (२) संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर (३) हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर, (४) वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर (५) वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर (६) स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर अशा एकूण सहा स्वायत्त महाविद्यालयांचा समावेश आहे.

**(१५) विविध पुरस्काराची योजना :**

विद्यापीठाकडून शिक्षण, समाज, कला, क्रीडा, संस्कृतिक, वैद्यकीय, उद्योग अशा विविध क्षेत्रांमध्ये अत्युच्च योगदान देणाऱ्या एका व्यक्तीचा विद्यापीठ वर्धापनदिनी जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. त्याचबरोबर (१) उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार, (२) उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार, (३) उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, (४) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ), (५) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय), (६) उत्कृष्ट शिक्षकेतर अधिकारी पुरस्कार – वर्ग १ व २ (विद्यापीठ), (७) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार – वर्ग ३ (विद्यापीठ), (८) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार – वर्ग ४ (विद्यापीठ), (९) उत्कृष्ट शिक्षकेत्तर पुरस्कार लिपिक संवर्गीय (महाविद्यालय), (१०) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारीपुरस्कार– चतुर्थश्रेणी (महाविद्यालय), पुरस्कार देखील विद्यापीठ वर्धापन दिनानिमित्त वितरित केले जातात यातून आपल्या कार्याची दखल विद्यापीठ घेते त्यामुळे अशा पुरस्कारातून अधिक जोमाने कार्य करण्याची प्रेरणा व प्रोत्साहन देण्याचे काम विद्यापीठ करीत आहे.








# सोलापूर : पर्यटनाचे शांत जंक्शन

सोलापूर हे नैसर्गिक आपत्तीपासून सदैव दूर राहणारे आणि बऱ्याच अंशी स्थिर स्वरूपाचे जीवन असणारे सुंदर पर्यटन जंक्शन आहे. हे नक्की..! बस्स ! येथील परिसराकडे पाहण्याची थोडीशी सौंदर्यदृष्टी आणि श्रद्धा मात्र हवी. सोलापूरला काय आहे हो ? साधी टेकडीही नाही..! असं म्हणून सोलापूरचे महत्व नाकारून चालणार नाही. येथे जे आहे, ते जगाच्या पाठीवर कोठेच नाही. हेही सत्यच आहे. बुद्धिवादी मानव म्हणून माणसाला आपल्या आयुष्यात स्थिरता हवीच असते. अन्न वस्त्र निवारा आणि भूत, भविष्य याचा विचार करून वर्तमान काळातली स्थिरता मिळवण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. अशी निवास व आहारादि स्थिरता मिळाली की माणसाला विहार आवडायला लागतो. श्रद्धा आणि विरंगुळा ही विहाराची दोन प्रमुख निमित्त्यो असतात. यादृष्टीने आपल्या सोलापूरकडे पाहिल्यास ते महत्वाचे पर्यटन केंद्र आहे, हे निर्विवाद सत्य ! येथील पर्यटन उद्योगास चालना देणारी बरीच केंद्रस्थाने आहेत. सोलापूरला दोन तीन दिवसांचा मुक्काम केल्यास वरील सर्व स्थळांना भेट देता येते.

सोलापूरला थांबून ही ठिकाणे पाहू शकता.. केवळ जीवनश्रद्धेचाच विचार केला तर महाराष्ट्राची आराध्य दैवते; पंढरपूरचे श्री विठुरखुमाई आणि कुलस्वामिनी श्री तुळजाभवानी, दत्तसंप्रदायात श्री गुरूदेव दत्त महाराजांचे चवथे अवतार समजले जात असलेले अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ आणि भीमा –अमरजा नद्यांच्या संगमावर गाणगापूरला श्री दत्त महाराजांचा नृसिंह सरस्वती रूपातील अवतार एवढी बलाढ्य दैवते सोलापूरपासून तास–दोन तासांच्या अंतरावरच आहेत. यासोबतच बार्शीला भगवंत अवतारातील भगवान श्री विष्णुंचे मंदिर, जवळच धाणगावी श्री संत माणकोजी बोधले यांचे समाधी मंदिर, अकलूजची श्री अकलाई देवी आणि करमाळ्याची श्री कमलाईदेवीची भव्य मंदिरे, कर्तव्यात राहूनही भक्ती करता येते; हे साधे भक्तितत्व सांगणारे महान संत श्री सावता माळी यांचे तीर्थक्षेत्र अरण आणि अरणहून अवघ्या ४/५ किलोमीटरवर असणा–या लऊळ येथे संत श्री कुर्मदासांचे समाधीस्थान, मंगळवेढा येथील संत श्री दामाजीपंत यांचे समाधी मंदिर, भीमा नदीच्या काठावरील माचणूर येथील पुरातन प्रसिद्ध शिवमंदिर व भीमा नदीच्या प्रशस्त घाटाशेजारी असलेले गुरूवर्य संत श्री बाबा महाराज आर्वीकर यांची तपोभूमी, सांगोला येथील नाझरे येथील श्री समर्थ पंचायन शिष्यांपैकी संत श्री रंगनाथ स्वामी आणि त्यांचे पुतणे संत श्री श्रीधर स्वामी यांचे जन्मस्थान, खर्डी येथील संत श्री सिताराम महाराज, पंढरपूरजवळ करकंब येथील श्री सद्गुरु भजलिंग महाराज संजीवन समाधी मंदिर आणि त्यांचे शिष्य असलेले श्री संतनाथ महाराज यांचे वैराग येथील भव्य मंदिर, सोलापूर शहरात तलावाच्या मध्यभागी असलेले शिवयोगी श्री सिद्धेश्वर महाराजांचे रमणीय मंदिर, आणि ऐतिहासिक ठिकाणे सोलापूरचा भुईकोट किल्ला तसेच विजापूरचा ऐतिहासिक गोलघुमट, तेथे जायच्या रस्त्यावरच हायवे सोडून जरासे डावीकडे वळले की, हत्तरसंग कुडल येथील सीना भीमेच्या संगमावर वसलेले, प्राचीन वास्तूशास्त्राचा उत्कृष्ट नमुना असणारे शिवमंदिर आहे. या सर्व



मंदिरांचे आणि ऐतिहासिक वारशांचे पर्यटन स्थळांत रूपांतर झाले आहे. मात्र यातील कांही स्थाने अद्यापही दुर्लक्षित आहेत, परंतु शासनाची दृष्टी आणि स्थानिकांची दूरदृष्टी या दोन्हींचा संगम झाल्यावरच कोणत्याही स्थानाचा भौगोलिक सोयी सुविधांचा विकास शक्य होतो, अन्यथा नाही. असेही काहीसे सोलापूर बाबत झाले आहे..

वस्तू व अन्न उद्योगनगरी सोलापूर

सोलापूर येथील वस्त्रउद्योग तर ब्रिटिश काळापासून विश्वविख्यात आहे. येथील उत्तम गुणवत्तेच्या सोलापूरी चादरी आणि बेडशीटचा हँडलूम उद्योग जगप्रसिद्ध आहे. त्याचबरोबर अन्न उद्योगात विश्वविख्यात चवीची खमंग लसणाची आणि बिनलसणाची शेंगाचटणी तसेच कडक भाकरींची चव चाखायला पर्यटकांनी अवश्य येथे आलेच पाहिजे. कर्नाटकाचे प्रवेशद्वार सोलापूर

> सोलापूरला काय आहे हो ? साधी टेकडीही नाही..! असं म्हणून सोलापूरचे महत्व नाकारून चालणार नाही. येथे जे आहे, ते जगाच्या पाठीवर कोठेच नाही. हेही सत्यच आहे. बुद्धिवादी मानव म्हणून माणसाला आपल्या आयुष्यात स्थिरता हवीच असते. अन्न वस्त्र निवारा आणि भूत, भविष्य याचा विचार करून वर्तमान काळातली स्थिरता मिळवण्यासाठी प्रत्येकजण धडपडत असतो. अशी निवास व आहारादि स्थिरता मिळाली की माणसाला विहार आवडायला लागतो.

येथे येण्यासाठी भरपूर फ्रिक्वेन्सी असलेला रेल्वेमार्ग, वंदेभारत व अन्य रेल्वेगाड्या उपलब्ध असून पुण्याहून साडेतीन ते साडेचार तासात येथे पोहोचता येते.. याशिवाय राज्य परिवहन मंडळाच्या भरपूर बसेसही उपलब्ध आहेत. स्वतःच्या वाहनाने आल्यास किंवा येथे येऊन खासगी वाहनाने वरील सर्व ठिकाणे वेळेच्या वैयक्तिक नियोजनानुसार दोन ते चार दिवसात पाहता येतात. येथे थ्री स्टार, फाईव्हस्टार, लक्झरी, सेमिलक्झरी हॉटेल्स उपलब्ध आहेत. या सर्व हॉटेल्समध्ये सोलापुरी शेंगा चटणी आणि कडक भाकरी आणि इतर खाद्यपदार्थांचा आस्वाद घेऊ शकतो. आध्यात्मिक राजधानी पंढरपूर सोलापूरपासून अवघ्या ६५ किलोमीटर अंतरावर दक्षिणकाशी म्हणून ओळखले जात असलेल्या पंढरपूरला प्राचीन पुरातन असा हरीभक्तीचा वारसा आहे. भीमा चंद्रभागेच्या तिरी वसलेली ही नगरी भागवत संप्रदायाचे मूळ भक्तीपीठ आणि अनेक संतांचे श्रद्धास्थान आहे. अत्यंत वाजवी दरात पंढरपूर येथे विठ्ठल मंदिर समितीचे भक्त निवास, श्री गजानन महाराज शेगाव संस्थानचे भक्तनिवास, एमटीडीसीचे पर्यटक निवास आणि अन्य खाजगी निवासव्यवस्था उपलब्ध आहे. विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन, चंद्रभागा स्नान, केवळ नावेतून करता येणारे विष्णुपद दर्शन, मूर्ती कलेचा नमुना म्हणून संत कैकाडी बाबा मठ ही इथे पाहण्यासारखी स्थळे आहेत खवय्यांचे लाडू करण्यासाठी वृंदावन येथे चौपाटी सायंकाळी सज्ज असते.

तुळजापूर, तुळजापूर – महाराष्ट्राचे आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचे आराध्य दैवत आई कुलस्वामिनी तुळजाभवानी हे सोलापूरपासून अवघ्या ४२ किलोमीटरवर आहे. तुळजाभवानी मंदिर अतिभव्य आहे, ते खसखशी घडणीच्या काळ्या पाषाणात बांधलेले आहे. नवरात्रात नऊ दिवशी वेगवेगळ्या दुर्गातारांनी देवीची मूर्ती सजवली जाते. पाचव्या दिवशी भवानी माता शिवछत्रपतींना तलवार देते; असेही एक रूप राजा शिवछत्रपतींच्या प्रतिमेसहित केले जाते. मंदिर परिसरात, गोमुख आहे. यातून अखंडपणे गंगा वहाते, तसेच सर्व नद्यांचे पाणी ज्यात आहे, अशी वदंता असलेले भाविकांच्या स्नानासाठी कल्लोळ आहे. गोमुख आणि कल्लोळात स्नान केल्यास पापमुक्ती मिळते अशीही भाविकांमध्ये श्रद्धा आहे. बालाघाटच्या डोंगरात वसलेल्या या तीर्थक्षेत्रामध्ये, दरीमध्ये शिवपार्वतीने सारीपाट खेळलेल्या जागी एक मंदिर आहे. येथे एमटीडीसीची निवास व्यवस्था, मंदिर समितीची धर्मशाळा व खाजगी निवास व्यवस्था होऊ शकते. शिवयोगी सिद्धरामेश्वर मंदिर सोलापूर श्री सिद्ध रामेश्वर महाराजांनी बांधलेल्या विस्तीर्ण तलावात मधोमध एका बेटावर हे सुंदर मंदिर आहे. चारी बाजूंनी पाणी, पश्चिमेला भुईकोट किल्ल्याची पार्श्वभूमी, असे हे देखणे शिवमंदिर व श्री सिद्ध रामेश्वरांची समाधी येथे आहे. सिद्धरामेश्वरांनी सामाजिक समतेचा पुरस्कार व प्रचार केला. लिंगायत सांप्रदायातील अतिशय श्रद्धेचे हे देवस्थान आहे. मुळातच श्री सिद्धरामेश्वर यांनी हे सोन्नलगी नावाचे गाव स्थापित केले; सोन्नलगीचा अपभ्रंश होऊन



**दीपक कलढोणे**
**ज्येष्ठ गायक, सोलापूर**

पुढे हे गाव सोलापूर या नावाने ओळखले जाऊ लागले. संक्रांतीच्या वेळी सोलापूरला गड्डा महायात्रा भरते. या यात्रेमध्ये असलेले मानाचे सात नंदीध्वज विविध समाजातील व जातीतील लोक मिरवत शुद्ध रामेश्वरांच्या मंदिरापाशी आणतात. या यात्रेमागे असलेल्या विधीची कथा सोलापूरला येवून सिद्धरामेश्वर यांच्या पुजाऱ्यांकडून ऐकावी अशी आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी दुपारी आणि सायंकाळी महाप्रसादासाठी दासोह येथे चालवला जातो. हा महाप्रसाद मोफत असतो.तलावाशेजारी असलेल्या आदिलशाहीच्या काळातला भुईकोट किल्ला हा सोलापूरचा ऐतिहासिक वारसा आहे. याशिवाय तुळजापूर रोडवरील हिप्परगा तलावामध्ये दरवर्षी फ्लेमिंगो (अग्निपक्षी) साता समुद्रापार उड्डाण करत बराच काळ मुक्कामाला असतात. माळढोक या अतिशय दुर्मिळ अशा पक्षांच्या जतन व संवर्धनासाठी येथे नान्नज गावी अभयारण्यही आहे. याशिवाय सोलापूरला आल्यानंतर चादरी, बेडशीटे आणि सोलापुरी टॉवेल खरेदी करणार नाहीत असे पर्यटक दुर्मिळ असतात. येथील मुद्दा शेंगाचटणी आणि कडक भाकरी महाराष्ट्रात लोकप्रिय आहे,

(पान ७ वर...)

दै. सुराज्यच्या वर्धापन दिनास हार्दिक शुभेच्छा !
व दीपावलीनिमित्त सर्वांना शुभेच्छा!

अध्यक्ष

श्री.पुंडलिक लक्ष्मण कलखांबकर

उपाध्यक्षा

सौ. अपर्णा बंडोपंत मानकोसकर

संचालक : श्री. काशिनाथ विजापुरे, श्री. मंजुनाथ भतगुणकी, श्री. मल्लिकार्जुन सोमेश्वर, श्री. शंकर अजगोंडे, श्री. पोमू राठोड, श्री. अभिजीत सुर्डीकर, श्री. योगेश बारसकर, श्री. परमेश्वर किणगे, श्री. सिध्दाराम तेग्गेळ्ळी, श्री. सुनील सवळी,
संचालिका सौ. राजश्री सोलापुरे,
तज्ञ संचालक : श्री. बाळकृष्ण म्हेत्रे,
सचिव : श्री. प्रकाश पाटील,
सहसचिव : श्री. शिवलिंगप्पा हारकुड

शुभेच्छुक
अक्कलकोट तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था नियमित, अक्कलकोट, जि.सोलापूर

दैनिक सुराज्यच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा



श्री.जाफर हनीफ मुल्ला
कॉन्ट्रॅक्टर

सौ.नसीमा जाफर मुल्ला
मा.सरपंच–कडबगांव

शुभेच्छुक
मुल्ला कन्स्ट्रक्शन
कडबगांव, ता.अक्कलकोट

शिवलिंगेश्वर पेट्रोलियम पंप
अक्कलकोट स्टेशन ते अक्कलकोट रोड, कडबगांव, ता.अक्कलकोट




दैनिक सुराज्यच्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा!

श्री.श्रीकांत खानापुरे — अध्यक्ष
श्री.सिद्राम वाघमोडे — कोषाध्यक्ष
श्री.प्रकाश मेंथे — सचिव

विश्वस्त मंडळ : ज्ञानेश्वर फुलारी, शांतय्या स्वामी, परमेश्वर सुतार, चौडप्पा सोलापुरे, बिरप्पा पुजारी

श्री जागृत मारुती मंदिर व सर्व कार्यकारी समिती
गौडगांव बु।।, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर
अन्नदान व बांधकाम सेवेत सहभागी व्हावे



डॉ. अशोक विरपाक्षप्पा हिप्परगी
B.A.M.S.

सुराज्य च्या वर्धापनदिनास हार्दिक शुभेच्छा

हिप्परगी हॉस्पिटल अँड डायग्नोस्टिक सेंटर

पानमंगरुळ, ता.अक्कलकोट, जि.सोलापूर
उपलब्ध सेवा : डिजिटल एक्स-रे, पॅथॉलॉजी, डिलेव्हरी, सोनोग्राफी व सर्वप्रकारच्या ऑपरेशनची सोय

२४ तास तातडीची सेवा

उपलब्ध डॉक्टर : डॉ. संगमेश्वर बिरादार | डॉ. सागर हिप्परगी | डॉ. रश्मी हिप्परगी

# सोलापूर : पर्यटनाचे शांत जंक्शन

पान ६ वरुन ...



एवढेच नव्हे तर अलीकडच्या काही वर्षात सोलापूरच्या या पदार्थांनी परदेशातही नावलौकिक मिळवला असून या पदार्थांची निर्यात परदेशातही होत आहे. गरम थालीपीठ लोणी, शेंगा चटणी आणि कडक भाकरीचा आस्वाद घेण्यासाठी सोलापूरला जरूर भेट द्यावी..

अक्कलकोट वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर सोलापूरपासून चाळीस किलोमीटरवर श्री गुरुदत्तात्रेयांचे चौथे अवतार समजले जात असलेल्या श्री स्वामी समर्थ यांचे समाधी मंदिर अवघ्या पाऊण ते एक तासाच्या कालावधीत पोहोचता येते. श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाला येणाऱ्या भाविकांसाठी अन्नछत्र मंडळातर्फे दुपारी व सायंकाळी मोफत प्रसादाची व्यवस्था आहे. याशिवाय अत्यल्प दरात भक्तनिवास उपलब्ध आहे. येथे वातानुकूलित खोल्यांची ही सोय आहे.

श्रीक्षेत्र गाणगापूर अक्कलकोटपासून केवळ ७० किलोमीटर अंतरावर कर्नाटकमध्ये असलेले श्री गाणगापूर तीर्थक्षेत्र आहे. श्री नृसिंह सरस्वती यांचे हे मंदिर भीमा अमरजा या दोन नद्यांच्या संगमावर वसलेले आहेत. दत्त संप्रदायातील हे अतिशय महत्वाचे तीर्थक्षेत्र असून भाविक अत्यंत श्रद्धेने गाणगापूरला येत असतात. सोलापूरपासून एकशे दहा किलोमीटर अंतरावर असलेले गाणगापूर धार्मिक पर्यटनासाठी सोलापूरला जोडले गेले आहे.

संत सावतामाळी यांचे अरण श्री नीरा नृसिंहपूर,

श्री अकलाई आणि व श्री कमलाई देवी सोलापूरहून पुणे मार्गावर सत्तर किलोमीटर अंतरावर संत सावतामाळी यांचे गाव, समाधी स्थान श्रीक्षेत्र अरण आहे . मंदिर लाकडी खांबांचे आहे. श्रीक्षेत्र देहुला श्री तुकाराम महाराज अभंग स्मारक मंदिरात जसं चिमण्यांचा कलकलाट ऐकू येतो अगदी तसा मंदिरामध्ये दिवसभर चिमण्यांचा चिवचिवाट चाललेला असतो. शहरी भागात राहणाऱ्या माणसांना चिमण्यांचे मनमुराद दर्शन देणारे हे मंदिर विलक्षण शांत वातावरणामध्ये व मन प्रसन्न करणारे आहे. अरणपासून टेंभुर्णी मार्गे श्रीक्षेत्र नीरा नरसिंहपूर ४५ किलोमीटरवर आहे. भगवान विष्णूंच्या श्री नृसिंह अवतारांचे अत्यंत भव्य असे हे मंदिर नीरा आणि भीमा या दोन नद्यांच्या संगमावरती मोठ्या दिमाखात उभे आहे.. मंदिराच्या बाजूला अतिशय प्रशस्त असे घाट आहेत. नद्यांच्या तीरावर असल्याने स्वाभाविकच मंदिर उंच जागी आहे. श्रीक्षेत्र नीरा नरसिंहपूरहुन अकलूजला २० किलोमीटर अंतरावर असलेल्या अकलूजला नीरा नदीच्या किनाऱ्यावरचे अकलाई देवीचे प्रशांत मंदिर आहे. अकलूजलाही एक भुईकोट किल्ला आहे. तसेच बच्चे कंपनी आणि मोठ्यांना मौजमजेसाठी सयाजी वॉटर पार्क आहे. याशिवाय अकलूजला सयाजी वॉटर पार्क आहे. तेथे पर्यटकांना विविध पर्यटन खेळ आणि बोटिंगच्या आनंद लुटता येतो

देवी दर्शन करून टेंभुर्णीला येऊन करमाळ्याला जाता येते. करमाळ्याला कमलाई देवीचे प्राचीन मंदिर असून विस्तीर्ण अशा प्रांगणामध्ये उभा असलेल्या दीपमाला लक्ष वेधून घेतात. या मंदिराच्या भोवती असलेली मोठी विहीर हा एक बांधकाम शास्त्राचा उत्तम नमुना म्हणून पाहण्यासारखा आहे. पंढरपूरजवळ करकंब नावाचे गाव आहे. येथे शिवकालीन सोन्याची कनकंबा मूर्ती होती. अफजलखान शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी मोहिमेवर आला असता त्याने येथील हेमाडपंथी मंदिरातील मूर्तींची मोडतोड केली. करकंब गावचे हे ग्रामदैवत आहे. येथे श्री सद्‌गुरू बसलिंग महाराजांची संजीवन समाधी आहे. श्री भोजलिंग महाराज यांचे शिष्य श्री संतनाथ महाराज यांचे बार्शीजवळ वैरागला मोठे मंदिर आहे. सोलापूर जिल्हा ज्वारीचे कोठार येथील माती आणि नैसर्गिक हवामान हे ज्वारी या पिकास अत्यंत उपयोगी असल्याने सोलापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर ज्वारीचे पीक घेतले जाते. म्हणून सोलापूर जिल्ह्याला ज्वारीचे कोठार असेही म्हणतात. यामुळेच डिसेंबर व जानेवारीमध्ये ज्वारीचा हुरडा खाण्याची मजा काही औरच. येथील शेतकरी मोठ्या हौसेने आपल्या पै पाहुण्यांसाठी हुरडा पार्टीचे आयोजन करतात. त्याचबरोबर अलीकडील काही काळात काही फार्म हाऊसवर चार आणि आठ तासाच्या पॅकेजमध्ये व्यावसायिक स्वरूपात हुरडा पार्टीचे आयोजनही केले जाते. त्याालाही खवय्यांचा उदंड प्रतिसाद मिळत असतो. वर्षातून एकदा गुळभेंडी हुरडा आणि अस्सल मालदांडी जातीचा ज्वारीचा कोवळा हुरडा खाण्यासाठी सोलापूरला जरूर यावे.अशा रीतीने सोलापूर जिल्हा हे धार्मिक व औद्योगिक पर्यटन स्थळ म्हणून गणले जाते. पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगाराची संधी मिळते. पर्यटनामुळे व्यापारास चालना मिळते या दृष्टीनेही सोलापूर जिल्हा पर्यटनासाठी अधिक अनुकूल होणे व पर्यटकांसाठी अधिक सोयी सुविधा करणे गरजेचे आहे.

# पंढरपूर काल आज आणि उद्या

पान ५ वरुन ...

कारखान्यांमुळे पंढरपुरातील शेतकरी सुजलाम सफलाम झाला. सामान्य शेतकरी स्वतःच्या पायावर उभा राहिला.पंढरपूरच्या बाजार समितीतही मोठी उलाढाल होत असते.इथे बेदाण्याचा लिलाव होतो. त्यामुळे सोलापूर,सांगली,कोल्हापूर येथून व्यापारी बेदाणा घेण्यासाठी येथे येत असतात.सांगोल्याची घोंगडीही इथे विकली जाते.हा सारा व्यापार पंढरपूरसाठी प्लस पाईंट आहे.

बागायती क्षेत्र वाढल्यामुळे पंढरपूर शहर व तालुक्यातील जमिनीच्या किमती गगनाला भिडल्या. पंढरपूर तालुक्याच्या विकासात कर्मवीर कै. औदुंबरअण्णा पाटील व कर्मयोगी कै. सुधाकरपंत परिचारक यांचा मोलाचा वाटा आहे. आज पंढरपूरचे नागरिकरण मोठ्या प्रमाणात झाले आहे. पंढरपूर अनेक उपनगरात वसले आहेत. परंतु पंढरपूरचा औद्योगिक विकास म्हणावा असा झाला नाही,हे वास्तव आहे. त्यामुळे पंढरपुरातील पदवीधर तरुणांना नोकरीसाठी पुणे मुंबई येथे जावे लागते. पंढरपूर येथे श्री विठ्ठल रुक्मिणी इंजिनियरिंग कॉलेज गोपाळपूर, कर्मयोगी इंजीनियरिंग कॉलेज, न्यू सातारा कॉलेज या माध्यम



ातून असंख्य अभियांत्रिकी पदवीधर उत्तीर्ण होऊन बाहेर पडत आहेत. परंतु पंढरपूर शहर व तालुक्यात तरुणांना रोजगार उपलब्ध नसल्यामुळे बाहेरगावी रोजगारासाठी जावे लागते. एमआयडीसीच्या माध्यमातून छोटे छोटे उद्योग आले पाहिजे,याची दक्षता लोकप्रतिनिधींनी घेतली पाहिजे. आजच्या पंढरपूरकडे पाहिले असता पंढरपुरात श्री विठ्ठल मंदिरामुळे विठ्ठल मंदिर परिसरातील लोकांना रोजगार उपलब्ध होत आहे

उद्याच्या पंढरपूरकडे नजर टाकली असता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पंढरपूरसाठी ड्रीम प्रोजेक्ट असलेला कॉरिडॉर म्हणजेच पंढरपुरातील रस्ते रुंदीकरण पुन्हा होणार आहे. याबाबत अंतिम निर्णय झाला असून लवकरच पंढरपुरात काशी उज्जैन च्या धरतीवर कॉरिडॉर राबवला जाणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॉरिडोर मधील बाधितांना चांगली नुकसान भरपाई देण्याचे सांगितले असले तरी पंढरपूरसाठी कॉरिडोरचे स्वरूप आणण्यासाठी नुकसान भरपाई म्हणून भरपूर मोबदला सरकारने देवू केला आहे.तो पैसा पुरेसा ठरणार नाही. बाधित माणूस उध्वस्त होऊन जाईल हे कटू सत्या आहे. आजही विस्थापित झालेले अद्यापही सावरलेले नाहीत. कारण व्यवसायाची जागा बदलली. यात्रेचे चार-पाच दिवस सोडले तर पंढरपुरात काय आहे. यासाठी पूर्वीची अपुरी कामे पूर्ण करावी. खड्डे मुक्त पंढरपूर करावे, चंद्रभागा नदीवरील घाट पुनर्बांधणी करून स्वच्छ व सुंदर वाळवंट करावे. दर्शन व्यवस्था व्हीआयपी करांच्या जाळ्यात न



अडकता सुलभतेने दर्शन व्यवस्था कशी होईल हे पाहणे गरजेचे आहे. पंढरपुरात कारखानदारीचा अभाव,एमआयडीसीचा कागदपत्री असलेला वास असताना येथे उद्योगधंदे विकसित करावे. गरजूंना विठ्ठल रुक्मिणी देवस्थान तर्फे अर्थसहाय्य व विविध लघु उद्योगासाठी नाममात्र आर्थिक मदत करावी, तर पंढरपुरातील नागरिकांना स्वावलंबी जीवन जगताना जो तो जगा आणि जगू द्या या हेतूने राहू लागेल. उद्याचे पंढरपूर एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ असे असेल यासाठी कॉरिडॉर करताना बाधित नागरिकांना योग्य मोबदला मिळालाच पाहिजे तसेच त्यांच्या हातांना उद्योग धंदा मिळण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत.




# गरिबी दूर करण्याची उमेद...

**विष्णू सुरवसे**
**उत्तर सोलापूर-प्रतिनिधी**

सन २०११ मध्ये केंद्र शासनाने ग्रामीण भागातील गरिबी दूर करण्यासाठी राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोनती अभियानाची सुरुवात केली. महाराष्ट्रातही या महत्वाकांक्षी अभियानाची अंमलबजावणी होत आहे. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष समिती अभियानाच्या संचालनासाठी स्थापित आहे, ग्रामविकास विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान या स्वतंत्र संस्थेची स्थापना १८६० च्या संस्था नोंदणी अधिनियमांतर्गत करण्यात आली. याच अभियानाला राज्यभर उमेद नावाने ओळख मिळालेली आहे. आज हे अभियान राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये आणि ३५१ तालुक्यांमध्ये राज्यातील सर्व ग्राम पंचायतीमध्ये पूर्ण ताकदीने राबविले जात आहे, ज्यामुळे समुदायांचे जीवनमान उंचावण्यासाठी अथक प्रयात्न केले जात आहेत.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीमप्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाने आणि सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी पोषक वातावरणाची निर्मिती करण्याचे काम केले जात आहे. हे त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वांवर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करून, त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी मिळवण्याच्या दृष्टीने केले जात आहे.

उमेद अभियानाचा मुख्य उद्देश महाराष्ट्रातील ७१ लाख गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविकेच्या माध्यमातून गरिबीतून बाहेर काढणे हा आहे. हे महत्वाकांक्षी ध्येय विविध घटकाद्वारे साध्य केले जाते. ज्यामध्ये समुदाय संघटन स्थापन करून गरिबांनी, गरिबांसाठी निर्माण केलेल्या मजबूत समुदायस्तरीय संस्थांची निर्मिती करणे असा आहे. नाविन्यपूर्ण प्रकल्प निर्माण करून विविध पथदर्शी प्रकल्प राबवणे आणि स्वयंसेवी, शासकीय तसेच खाजगी संस्थांसोबत भागीदारी वाढवणे या प्रकारचे काम सातत्याने सुरु आहे.

ग्रामीण गरीब महिलांना अभियानामार्फत आणि विविध वित्तीय संस्था व बँकांच्या मदतीने शाश्वत उपजीविकेचे स्त्रोत उभे करण्यासाठी वेळेवर, किफायतशीर व्याज दराने व नियमित वित्त पुरवठा करण्यात येत आहे. उमेद

> **महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत ग्रामीण महाराष्ट्रातील गरीब व जोखीमप्रवण कुटुंबांना समृद्ध, आत्मसन्मानाने आणि सुरक्षित जीवन जगता यावे यासाठी पोषक वातावरणाची निर्मिती करण्याचे काम केले जात आहे. हे त्यांच्या सर्वसमावेशक, लोकशाही तत्वांवर आधारित स्वयंचलित समुदाय संस्थांची निर्मिती करून, त्यांचे अधिकार व हक्क, विविध वित्तीय सेवा तसेच शाश्वत उपजीविकेच्या संधी मिळवण्याच्या दृष्टीने केले जात आह**

अभियानाने दारिद्र्य निर्मूलनाचा एक समग्र विचार केला आहे, ज्यात समुदाय विकासापासून ते शाश्वत उपजीविका निर्माण करण्यापर्यंतच्या सर्व बाबींचा समावेश आहे यामध्ये सामाजिक समावेशन अंतर्गत प्रत्योकाला स्थान आणि आवाज मिळणे सुनिश्चित करणे, आर्थिक समावेशन अंतर्गत आर्थिक सहभागासाठी संधी निर्माण करणे, वित्तीय समावेशन अंतर्गत आवश्यक वित्तीय सेवा उपलब्ध करून देणे अशा बाबींचा समावेश आहे. समुदायस्तरीय संस्थांची क्षमता बांधणी करण्यासाठी सर्व स्तरावर प्रशिक्षण देण्यासारखे उपक्रम राबविले जात आहेत. सहभागी महिलांना आर्थिक साक्षर करणे, बचतीच्या सवयीतून आर्थिक शिस्त येणे, उद्योजकतेचा विकास होऊन उद्यमी होण्याचा मार्ग सुकर करणे यासारख्या बाबींचा समावेश करून क्षमता विकसित करण्याचे काम अभियानांतर्गत नियमित सुरु आहे.

ग्रामीण भागातील महिलांना त्यांच्या उत्पादनांची विक्री करता यावी आणि त्यांना हक्काची बाजारपेठ मिळावी या करिता उमेद अभियानच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय भव्य दिव्य असे महालक्ष्मी सरस भव्य प्रदर्शन व विक्रीचे आयोजन केले जाते. तसेच, विभागीय स्तरावर आणि जिल्हा स्तरावर सुद्धा तत्सम प्रदर्शनाचे आयोजन केले जाते. ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना हक्काची आणि शास्वत बाजारपेठ मिळावी यासाठी अभियानाने . ही ई कॉमर्स सेवा सुरु केलेली आहे.गेल्या १२ वर्षांच्या अंमलबजावणीमध्ये उमेद अभियानाचे सकारात्मक परिणाम राज्यभरात दिसून येत आहेत. ग्राम संघ आणि प्रभाग संघांची स्थापना होऊन संस्थात्मक बळकटीकरण होत आहे. महिला सदस्यांच्या सर्व प्रकारच्या क्षमतांचा आणि कौशल्यांचा विकास होताना दिसत आहे. स्वयंसहाय्यता गटांच्या महिलांचे शेती आधारित आणि बिगर शेती आधारित उद्योग व्यवसाय लाखोंच्या संखेने उभा आहेत आणि त्याच गतीने अनेक व्यवसाय मोठ्या प्रमाणात यशस्वीपणे उभे राहत आहेत.उमेद ही संस्था जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणा या विभागाच्या निगराणीखाली आहे..

उमेद हे केवळ एक अभियान नाही तर ते एक आंदोलन आहे, जे खऱ्या अर्थाने ग्रामीण महाराष्ट्रात बदल घडवून आणत आहे, समुदायांना सक्षम करत आहे आणि आत्मनिर्भरता व सन्मानाचे भविष्य घडवत आहे. उमेदने दिले लाखो महिलांना रोजगार, उत्पादन केलेल्या वस्तूची परदेशात जोमाने विक्री-ग्रामीण भागातील अल्प शिक्षित, उच्च शिक्षित महिला एकत्र येत संघटित होऊन उमेद अभियान ही एक चळ वळ निर्माण होत गेली.छोटा लघउद्योगाच्या माध्यमातून आर्थिक सक्षमी करण करीत असल्याने महिलांच्या हातात पैसा खेळत आहे यातील काही महिलांनी तर फेडरेशन केल्याने मजबूत अशी आर्थिक संस्था देखील उभी केली आहे. प्रत्योक महिलेस कामासोबतच आर्थिक नियोजनाचे गणित जुळवत आहेत.

ग्रामीण भागातील ग्रामस्थांचा मुख्य व्यवसाय हा शेती आहे, यासोबतच शेतीला पूरक व्यवसाय म्हणून म्हैस पालन, कुक्कुट पालन, बकरी पालन असा घरगुती व्यवसायातून घर गडयला मदत केली जात होती. चूल व मूल या चौकटीतून बाहेर पडत स्वतःचे वेगळे अस्तित्त्व निर्माण करण्यासाठी उमेद अभियानच्या सामाजिक ,आर्थिक, वित्तीय आणि शास्वत उपजिवेकीसाठी बचत गट स्थापना व उद्योग प्रोत्साहन देण्यास करण्यास सुरुवात करण्यात आली. शिकलेली महिला घर पुढे न्हेयील या म्हणीला सत्याात उतरविण्यासाठी उमेद मधील अधिकारी कर्मचारी यांच्या दैनंदिन मार्गर्शन व नियंत्रण खाली दश सुत्रीचे पालन करत कुटीर उद्योग, लघु उद्योग उभारणी साठी राष्ट्रीय कृत बँकाणी देखील सढळ हाताने, कमी व्याजाणे आणि ठराविक वेळेसाठी आर्थिक मदत देऊ केली. कडक भाकरी, विविध प्रकारची चटणी, लोणची, विविध प्रकारची मसाले, माती पासुन शोभेच्या वस्तू,छोटा मात्र उपयोगी ग्रह उद्योग सुरू झाल्याने रोजगार उपलब्ध होऊ लागल्याने खरेदी, विक्री, नफा-तोटा, गाव ते जिल्हा याचे नियोज, आर्थिक असे विविध पैलूंचे द्यान मिळू लागले.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानामार्फत सोलापूर जिल्ह्यात महिलांच्या सक्रिय सहभागातून सामूहिक पातळीपर्यंत विस्तारलेले सक्षमीकरणाचे व लोककेंद्री महिलांच्या संस्था उभारण्याचे आव्हानात्मक कार्य शासकीय यंत्रणेद्वारे यशस्वीपणे केले जात आहे.

सोलापूर चे ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेमध्ये बचत गटातील महिलांनी बनवलेली वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात येते, जिल्हा परिषद मध्ये गेल्या तीन ते चार वर्षांपासून दीपावली अगोदर दोन दिवस विविध खाद्य पदार्थ, फराळीचे साहित्या शोभेच्या वस्तू, आकाश कंदील, लोकराच्या साहित्यने बनविण्यात आलेले विविध शोभवंत वस्तू, विविध प्रकाराची रोपे, ताजी फळ भाजी, हुरडा, कडक ज्वारीची व बाजारीची भाकरी, लोणची शेंगा चटणी, जवस व लसूण चटणी, विविध प्रकारची मसाले, दूध व दुग्ध जण्य पदार्थ पहावयास आलेले ग्राहक मोठ्या हौसेने खरेदी करत असल्याने या बचत गटातील महिलांना आर्थिक उत्पन्न मिळते या उत्पन्नातून खर्च वजा करत गुंतवणूक आणि हफ्ते फेड चांगल्या प्रमाणात केली जात असल्याने आर्थिक उलाढाल पहाता राष्ट्रीय बँक कमी व्याजाने कर्ज पुरवठा करत असते. त्यातून महिला आर्थिक सक्षम होताना दिसून येत आहे. सोलापूर जिल्ह्यसह इतर राज्यात देखील उत्पादन केलेल्या वस्तूला मागणी असल्याचे सांगितले जात आहे. बचत गटाच्या माध्यमातून चूल आणि मुलं सांभाळणारी ताई आज घर-दार, संसार व्यवस्थितपणे सांभाळत असून यापुढे जाऊन तिने लहान पन उपयोगी ग्रहउद्योग सुरु केल्याने आर्थिक हातभार कुटुंब कर्त्यास होत आहे. याचे श्रेय शासनाच्या जिल्हा ग्रामीण विकास योजने अंतर्गत असेलेल्या उमेद अभियानातील अधिकारी व कर्मचारी यांच्या इच्छाशक्ती व पाठबळामुळेच बदल होताना दिसून येत आहे.बचत गटातील महिला, बचत गट आर्थिक दृष्टीने सक्षम होत आहे.





